महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ❖१८ फेब्रुवारी २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २३४ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



# गीतासार



तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥२- ६८॥

म्हणून हे महाबाहो, ज्याची इंद्रिये इंद्रियांच्या विषयांपासून सर्व प्रकारे आवरून धरलेली असतात, त्याची बुद्धी स्थिर असते. ॥ २-६८ ॥

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥२- ६९॥

सर्व प्राण्यांच्या दृष्टीने जी रात्रीसारखी असते, अशा नित्य ज्ञानस्वरूप परमानंदाच्या प्राप्तीत स्थितप्रज्ञ योगी जागतो आणि ज्या नाशिवंत सांसारिक सुखाच्या प्राप्तीत सर्व प्राणी जागतात, ती परमात्मतत्त्व जाणणाऱ्या मुनीसाठी रात्रीसारखी असते. ॥ २-६९ ॥

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥२- ७०॥

ज्याप्रमाणे निरनिराळ्या नद्यांचे पाणी, सर्व बाजूंनी भरलेल्या व स्थिर असलेल्या समुद्रात त्याला विचलित न करताही सामावून जाते, त्याचप्रमाणे सर्व भोग ज्या स्थितप्रज्ञ पुरुषामध्ये कोणत्याही प्रकारचा विकार उत्पन्न न करताच सामावून जातात, तोच पुरुष परम शांतीला प्राप्त होतो. भोगांची इच्छा करणारा नव्हे. ॥ २-७० ॥

## आरोग्य टिप्स

# सोया चंक्स बॉल्स



**साहित्य**

1 कप सोय चंक्स
1 टेबलस्पून काश्मिरी लाल तिखट
2 पुडे मॅगी मॅजिक मसाला
1 टीस्पून दही
1 टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट
थोडी चिरलेली कोथिंबीर
1/2 लिंबू
चवीप्रमाणे मीठ
2 टेबलस्पून मैदा
2 टेबलस्पून कॉर्नफ्लॉवर
तळण्यासाठी तेल

**कृती**

उकळलेल्या पाण्यात सोया चंक्स घालून पाच मिनिटे झाकून ठेवणे. पाच मिनिटांनी दुसऱ्या पाण्याने धुऊन घेणे व त्यातील पाणी हाताने दाबून काढणे.
मिक्सरच्या भांड्यात घालून जाडसर वाटण करून घेणे. सर्व मसाले घेणे.
थँक्स बारीक केलेले एका मोठ्या बाऊलमध्ये काढून घेणे. त्यात आले-लसूण पेस्ट घालून घेणे. नंतर सर्व मसाले घालून घेणे. मॅजिक मसाल्यात मीठ असते. त्यामुळे मीठ घालताना थोडेसे कमीच घालावे. वरून लिंबू पिळून घ्यावा. सर्व व्यवस्थित मिक्स करून घेणे.
नंतर कॉर्नफ्लॉवर व मैदा घालून सर्व मिश्रण व्यवस्थित मळून घेणे. व्यवस्थित गोळा तयार करून झाला की, त्याचे छोटे छोटे बॉल्स तयार करून घेणे.
गॅसवर कढईत तेल घालून तापत ठेवणे. तेल तापले की गॅस मध्यम आचेवर ठेवावा. तेलात बसतील तेवढे, बॉल्स घालून घेणे. छान लालसर रंगावर तळून घेणे.
खाण्यासाठी तयार सोया चंक्स बॉल. हे तुम्ही हिरवी चटणी, नुसते किंवा टोमॅटो सॉस बरोबर खाऊ शकता.

## संक्षिप्त

# डोंबिवलीत रोजगार मेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
ठाणे : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे व लाईट हाऊस कम्युनिटीज फाऊंडेशन, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.20 फेब्रुवारी, 2025 रोजी सकाळी 9.30 वाजता डोंबिवली लाईट हाऊस, महावीर हाईटस, पाणी टाकी जवळ, वीर सावरकर रोड, डोंबिवली (पूर्व), जि.ठाणे येथे सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांकरिता रोजगार मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. या मेळाव्यात एस.एस.सी, एच.एस.सी, पदवीधर, आय.टी.आय / डिप्लोमा इ. या शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. तरी सर्व नोकरी इच्छुक उमेदवारांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे सहायक आयुक्त संध्या साळुंखे यांनी कळविले आहे.

# क्रांतिवीर लहूजी साळवे यांना केडीएमसीकडून भावपूर्ण आदरांजली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
कल्याण : क्रांतिवीर लहूजी साळवे यांच्या पुण्यतिथी दिनी आज महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. या समयी उपस्थित उपआयुक्त अतुल पाटील, महापालिका सचिव किशोर शेळके, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर, उद्यान अधिक्षक अनिल तामोरे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी देखील क्रांतिवीर लहूजी साळवे यांचे प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# भारतीय डाक सेवेत भरती

## अर्ज करण्याचे आवाहन

नवी मुंबई :- अधीक्षक डाकघर नवी मुंबई विभागाच्या कार्यक्षेत्रातील 21 रिक्त पदे भरण्यात येणार असून, इच्छुक उमेदवारांनी https://indiapostgdsonline.gov.in या संकेतस्थळावरुन 3 मार्च, 2025 पर्यंत किंवा त्यापूर्वी ऑनलाईन अर्ज भरावेत. असे वरिष्ठ अधीक्षक डाकघर, नवी मुंबई यांनी कळविले आहे.
भारतीय डाक विभागाने ग्रामीण डाक सेवक पदासाठी जाहिरात प्रसिध्द केली आहे. या जाहिरातीनुसार अधीक्षक डाकघर नवी मुंबई विभागाच्या कार्यक्षेत्रातील 21 रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. यासाठी कोणत्याही माध्यमाद्वारे आलेले अर्ज व व्यक्तिशः (By hand) आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. विहित पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांचाच विचार केला जाणार आहे. तसेच अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या सूचनांनुसार अर्जदाराला शुल्क भरावे लागेल.
पोस्ट विभाग उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे दूरध्वनी/ भ्रमणध्वनी कॉल करत नाही. उमेदवारांशी पत्रव्यवहार करावा लागला तर संबंधित प्राधिकरणाद्वारेच केला जातो. उमेदवारांनी त्यांची वैयक्तिक माहिती,नोंदणी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी इतरांसमोर उघड करू नये. कोणत्याही अनैतिक दूरध्वनी/भ्रमणध्वनी कॉल्सपासून सावध राहावे. जास्तीत जास्त इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज संकेत स्थळावरुन भरावेत. अधिक माहितीसाठी www.indiapostgdsonline.gov.in या संकेस्थळाला भेट द्यावी. असे आवाहन नवी मुंबई डाकघर विभागाचे वरिष्ठ अधीक्षक यांनी एका प्रसिध्दी प्रत्रकाव्दारे केले आहे.

# शालेय विद्यार्थ्यांना अग्निशमनाचे धडे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : शालेय जीवनातील विद्यार्थ्यांना समाज जीवनात घडणाऱ्या घडामोडीं बाबत प्रशिक्षण व शिक्षण दिले तर हेच विद्यार्थी भावी पिढीतील सजग नागरिक म्हणून समाजाची सेवा करण्यास तयार होत असतात .यासाठीच विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावे याकरता कळंबोलीतील न्यू मुंबई इंग्लिश स्कूलने सोमवारी सकाळी कळंबोलीतील अग्निशामक दलातील यंत्रणेला भेट देऊन कामकाजाची माहिती घेऊन अग्निशमन करतानाचा थरार अनुभवला .यावेळी मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके व उप अग्निशमन अधिकारी मनिष ग्यानीराम ब्राम्हणकर यांनी शालेय विद्यार्थ्यांना अग्निशमन यंत्रणेची माहिती दिली.

शासनाच्या निर्देशानुसार शाळेतील विद्यार्थ्यांना समाजातील विविध क्षेत्रातील कामकाजाची जवळून माहिती व्हावी, कामकाज कसे चालते ,एखाद वेळेस जर कोणतीही घटना घडली तर त्याबाबत सजग राहून कोणती उपाययोजना करावी याचे धडे देण्याची सूचना शासनाच्या वतीने दिलेली आहे .याचाच एक भाग म्हणून कळंबोलीतील न्यू मुंबई इंग्लिश स्कूल मधील शिकणाऱ्या तब्बल ६० विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष संतोष बैजनाथ शुक्ला यांनी कळंबोलीतील अग्निशामक दल विभागाला भेट देऊन त्याची माहिती दिली. यावेळी कळंबोलीतील अग्निशामक दलातील प्रमुख अधिकारी प्रवीण बोडके तसेच उप आधिकारी मनीष ब्राह्मणकर तसेच अन्य अग्निशामक सुरक्षा दलाच्या जवानांनी विद्यार्थ्यांना आपत्कालीन व्यवस्थेमध्ये कशा प्रकारे आगीवर किंवा अन्य घटनेवर नियंत्रण मिळवले जाते याची प्रात्यक्षिक करून माहिती दिली .यावेळी सायरन वाजवत कर्तव्यावर जात असणाऱ्या आगीच्या बंबातील सर्व यंत्रेची माहिती या शालेय विद्यार्थी विद्यार्थ्यांना दिल्याने विद्यार्थी ही चांगलेच सुखावले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांना आकर्षण असणाऱ्या आग वीजवणाऱ्या बंबाच्या गाडीमध्ये जाऊन त्याची माहिती घेताना विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. अग्निशामक यंत्रणेची माहिती , यंत्रणा कशी हाताळावी याची जवळून माहिती मिळाल्याने विद्यार्थी ,शिक्षकही चांगल्या प्रकारे सुखावले. कळंबोलीतील अग्निशामक दलात कार्यरत असलेल्या हायटेक प्रणालीची व यंत्रणेची माहिती ही मनीष ब्राह्मणकर यांनी विद्यार्थी शिक्षक यांना देऊन आपत्कालीन परिस्थितीमध्ये सजग नागरिक म्हणून आपण कसे वागावे याबाबतची ही विस्तृत माहिती देण्यात आली. फायर एक्स्टींगशन, तसेच हायड्रॉलिक टूल्स चे हाताळणी कशा प्रकारे केली जाते याची माहिती ही विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी बोलताना कळंबोली अग्निशामक दल प्रमुख मनीष ब्राह्मणकर म्हणाले की शालेय विद्यार्थ्यांना अग्निशामक यंत्रणे बाबत माहिती देताना आम्हालाही खूप चांगले वाटले. विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देऊन आम्हालाही समाधान प्राप्त झाले. आजचे विद्यार्थी हे भावी आयुष्यातील सजग नागरिक असणार आहेत. त्यामुळे त्यांच्यावर योग्य ते संस्कार न्यू मुंबई इंग्लिश स्कूल करीत आहे ही सुद्धा एक गौरवास्पद बाब आहे.

# सावरकरनगर मधील जेष्ठ नागरिक कट्टा वृद्धांचा आधारवड




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /
ठाणे : शहरातील धावपळीच्या अत्यंत व्यस्त जीवनशैलीमुळे स्वतः सह मुले, मुली व सुना इच्छा असताना सुद्धा वृद्धांना वेळ देऊ शकत नाहीत. त्यातच वाढती लोकसंख्या व त्यासाठी आवश्यक असणारे इमारतीचे जाळे दिवसेंदिवस सर्वांसाठी मोठा प्रश्न बनत आहे. या वाढत्या सिमेंटच्या जंगलामध्ये श्वास घेणे आवघड झाले आहे. अशातच वृद्धांसाठी व लहान मुलांसाठी मैदाने नाहीत. वृद्धांना दिवसभर घरात बसून राहील्यामुळे अनेक शारीरिक आजार होतात. या आजारापासून मुक्तता मिळवण्यासाठी त्यांना खुले वातावरण, मोकळी हवा असणे गरजेच असते पण ते मिळत नाही. त्याच सोबत त्यांना व्यायाम आणि एकमेकांशी चर्चा करणे सुद्धा आवश्यक असते. त्यामुळे चार भिंतीच्या आतील जीवन हे त्रासदाय बनत आहे.

अशातच या सर्वांची गरज लक्षात येताच सावरकर नगर, ठाणे येथील माजी नगरसेविका कांचनताई चिंदरकर व समाजसेवक बाळा चिंदरकर यांनी या सर्व समस्यांवर पर्याय शोधून वृद्धांना एकमेकांशी चर्चा करण्यासाठी वेळ मिळावा, त्यांना खुले वातावरण मिळावे, व्यायाम करता यावा म्हणून 2016 साली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मार्गदर्शनखाली सावरकर नगर, ठाणे येथील रोड नंबर 22 वरील ज्ञानोदय विद्यामंदिर शाळेच्या बाजुला ओपन जिम व आदर्श जेष्ठ नागरिक कट्टा उभारला असून या कट्ट्याच्या माध्यमातून आज रोजी येथे दिवस - रात्र ज्येष्ठ नागरिक, वृद्ध महिला व मुले एकत्र येऊन बसतात. या सर्वांमध्ये रोज भेटीगाठी होत असल्यामुळे त्यांच्यात एक मैत्रीचं नातं निर्माण झाले आहे. या मैत्रीच्या नात्यामुळे घरातील मुले, मुली व सून धकाधकीच्या जीवनामध्ये या वृद्धाना वेळ देवू शकत नसल्यामुळे हे सर्व मित्र एकमेकांच्या जीवनाचे साथीदार बनले आहेत. येथील सर्व ज्येष्ठ नागरिक एकमेकांच्या सुख दुःखांच्या चर्चा करतात व एकमेकांच्या सुख -दुःखामध्ये सहभागी सुद्धा होतात. यामुळे सावरकर नगर येथील आदर्श जेष्ठ नागरिक कट्टा या वृद्धांचा आधार बनला आहे. परिसरातील अनेक जेष्ठ नागरिक येथे तासनंतास विसावत आसून वृद्धापकाळातील जीवन आनंदाने जगत आहेत.

तसेच येथील जॉगिंग पार्क मध्ये ओपन जीम सुरू करण्यात आलेली आहे. या ओपन जीममध्ये वृद्धापकाळातील निर्माण होणारे शारिरीक आजारांसाठी लागणारे अनेक व्यायामाचे व खेळाचे साहित्य बसविण्यात आलेले आहे. सध्या उन्हाळ्याची चाहुल लागताच जेष्ठ नागरिक कट्ट्यावर वृद्धांची वाढती संख्या पाहता ओपन जिम मधील जिर्ण झालेल्या साहित्यांच्या जागी नवीन आधुनिक पद्धतीचे साहित्य व वृद्धांना बसण्यासाठी लागणारे नवीन बाकडे बसवण्यात आल्यामुळे व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्वीटरसारख्या सोशल मिडीयामध्ये गुंतलेल्या लहान मुलांना या जीममधील साहित्यासोबत खेळताना व्यायामाची आवड निर्माण झाली आहे. वृद्ध स्त्री - पुरुषांना या वयात आनंदी जीवन जगण्यासाठी व्यायामाची असलेली गरज ही ओपन जीम पुर्ण करत आहे. येथे दिवसभर व रात्री 11 ते 12 वाजेपर्यंत वृद्धांसह लहान मुले व्यायाम करताना दिसतात. या व्यायामा बरोबरच हे वृद्ध आपले विचारांची देवाणघेवाण करून विरंगुळा करत आनंदी जीवन जगताना दिसतात म्हणून ही ओपन जीम व आदर्श जेष्ठ नागरिक कट्टा वृद्धांचा आधार बनत आहे. सामाजिक बांधिलकी जपत माजी नगरसेविका कांचनताई चिंदरकर व समाजसेवक बाळा चिंदरकर हे जेष्ठ नागरिक कट्ट्यांचे माध्यमातून वृद्धांची सेवा करत आहेत.

# उल्हासनगर मनपा शाळेच्या कामाला मुहूर्त कधी ?



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर: पुनर्बांधणीच्या नावाखाली ८ वर्षांपूर्वी जमीनदोस्त केलेल्या महापालिका शाळा क्रं-२४ व १८ च्या इमारतीचे काम संस्थेगतीने सुरु आहे. येणाऱ्या शैक्षणिक वर्षात शाळेची घंटा वाजणार की नाही? असा प्रश्न समाजसेवक प्रा. प्रवीण माळवे यांनी महापालिका आयुक्ताना केला आहे. उल्हासनगर महापालिका शाळेतील मुलांच्या संख्येत घट होत असताना, दुसरीकडे शिक्षण विभागाचा ढिसाळ कारभार उघड झाला. खेमानी येथील शाळा क्रं-२४ व १८ च्या पुनर्बंधणीच्या नावाखाली शाळा इमारत ८ वर्षांपूर्वी जमीनदोस्त केली. त्यामुळे शाळेतील हजारो मुलांना एका खाजगी शाळेच्या इमारतीच्या क्षेत्रछायाखाली शैक्षणिक धडे गिरविण्याची वेळ आली. मूळ शाळा व आता भरत असलेल्या शाळेचे अंतर मोठे असल्याने, अनेक गरीब व गरजू मुलांनी आर्थिक परिस्थिती अभावी शाळेला कायमचा रामराम ठोकला. असी चर्चा परिसरात आहे. मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून यावर्षी तरी शाळेची घंटा वाजणार का?. की दुसऱ्याच्या खाजगी शाळेच्या प्रांगणात शैक्षणिक धडे मुलांना गिरवावे लागणार. असी शंका समाजसेवक प्रा. प्रवीण माळवे यांनी व्यक्त केली. महापालिका शाळेची इमारत पूर्ण होऊन येणाऱ्या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु होण्यासाठी अनेकांनी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. सामाजिक संघटना व मुलांच्या पालकांनी शाळा सुरु होण्यासाठी अनेकदा आंदोलनही केली. अखेर डिसेंबर २०२३ मध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते शाळेच्या इमारतीचे भूमिपूजन झाले. इमारतीचे चार मजले बांधून झाले. मात्र यावर्षी शाळा सुरु करण्याच्या मागणीने जोर पकडला आहे. नवनियुक्त आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी नुकतीच महापालिका शाळेचा दौरा करून कामात कसूर केल्या प्रकरणी एका शिक्षिकाला कारणे दाखवा नोटीस बजाविली. याशाळा इमारतीचा दौरा आयुक्तानी करून, शाळा सुरु करण्यावर भर द्यावा. असीही मागणी होत आहे.

# वंदे मातरम महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
डोंबिवली: जाह्नवीज मल्टी फाउंडेशनच्या वंदे मातरम डिग्री कॉलेज येथे काल दिनांक 15 फेब्रुवारी 2025 रोजी विज्ञानशाखा , वाणिज्यशाखा व मानव्यविद्याशाखा यांच्या सहयोगातून शाश्वत विकास या विषयावरती एक दिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून पर्यावरण आणि आंतरविद्याशाखीय ज्ञानाचा शाश्वत विकास व्हावा हा उद्देश त्यामागे आहे असे मत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजक डॉ. राजकुमार कोल्हे यांनी मांडले . वंदे मातरम डिग्री कॉलेज डोंबिवली (प) येथे ही दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न झाली, सकाळी आंतरराष्ट्रीय परिषदेची सुरुवात परिषदेचे प्रमुख अतिथी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी इतिहास प्रमुख डॉ. यादव गुजर सर आणि जाह्नवीज मल्टी फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे सर यांच्या शुभहस्ते झाली. सदरील आंतरराष्ट्रीय परिषद ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही स्वरूपात आयोजित करण्यात आली होती , या आंतरराष्ट्रीय परिषदेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे प्लास्टिक मुक्त परिषदेची रुपरेषा मांडण्यात आली परिषदेसाठी उपस्थित मान्यवरांना विद्यार्थ्यांनी बनवलेल्या टाकाऊ गवतापासून कागद व पेन या वस्तूंचे वाटप करण्यात आले या इको फ्रेंडली उपक्रमाबाबत मान्यवरांनी खूप कौतुक केले . या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी डॉ. परिण सोमानी ( चेअरमन, LOSD) इंग्लंड, डॉ. टेकेहिरो नाकामुरा ( फोरम शिन एडुज) जपान, यांनी ऑनलाइन परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या तर डॉ. हरेकृष्ण मारण (अध्यक्ष इम्पेरियल कॉलेज बेंगळुरू), डॉ .मोजेस कोलेट ( बांदोडकर कॉलेज ठाणे), डॉ .सुशीला विजयकुमार ( प्राचार्य मंजुनाथ कॉलेज डोंबिवली), श्री. जयेश खाडे ( IIT मुंबई), श्री सुशील कुमार शर्मा, डॉ. विनायक राजे प्राचार्य के.बी. कॉलेज ठाणे. तसेच जाह्नवीज मल्टी फाउंडेशनच्या सेक्रेटरी डॉ.प्रेरणा कोल्हे मॅम व खजिनदार जान्हवी कोल्हे मॅम यांची विशेष उपस्थिती होती तर आंतरराष्ट्रीय परिषदेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. आर एन. नाडार, उपप्राचार्या वनिता लोखंडे, मुख्य समन्वयक मंजुळा धावळे, ज्युनिअर कॉलेज प्राचार्य अल्पेश खोब्रागडे, आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समन्वयक विजयालक्ष्मी मॅम यांनी विशेष प्रयत्न केले तर परिषदेचे सूत्रसंचालन सुनिता पाटील, शरवरी, डॉ रागिनी, यांनी केले.

# आदिवासी विद्यार्थ्यांसोबत वाढदिवस साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
नवी मुंबई : नवी मुंबईतील घणसोली येथील स्थायिक असलेले आणि शासकीय आदीवासी आश्रम शाळा चिंबीपाडा येथे स्त्री अधिक्षिका या पदावर कार्यरत असलेल्या माधुरी लोखंडे शासकीय नोकरी मध्ये रुजू झाल्यापासून आपला वाढदिवस या आदिवासी विद्यार्थी विद्यार्थीनी सोबत साजरा करून आपला वाढदिवसाचा आनंद या विद्यार्थ्यांसोबत सहभागी होऊन साजरा करीत आहे. सामाजिक भान ठेवून आपल्याला आनंद कसा निर्माण करता येईल, आणि समाजामध्ये आपण आधुनिक शहरामध्ये स्थायिक झालो असलो, तरीही काही दुर्गम ग्रामीण भागमध्ये अजूनही आपले आयुष्य जगणे या पलीकडे काहीही माहीत नाही, तर नवी मुंबईमध्ये घणसोली येथे स्थायिक असलेल्या अधिक्षिका पदावर कार्यरत माधुरी लोखंडे यांनी समाजाप्रती आपले काही देणं आहे, या भावनेने शासकीय आदिवासी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा चिंबीपाडा तालुका भिवंडी येथील इयता पहिली ते दहावी शिकत असलेल्या 130 आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थीनीसोबत आपला जन्मदिन साजरा करीत विद्यार्थ्यांना केक आणि खाऊ वाटप करून वेगळा आनंद देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

यावेळी इयत्ता दहावी विध्यर्थिनीं भावुक होऊन त्यांचे शेवटचे वर्ष असून परीक्षा सुद्धा जवळ आली, असल्याने अश्रू अनावर झाले होते, मात्र तुमचे जरी या शाळेतील शेवटचे वर्ष असले तरी मी येथेच राहणार असून तुम्ही यापूढे चांगले उच्च शिक्षण घेऊन चांगल्या प्रकारे आपले आयुष्य उज्ज्वल करीत मला भेटायला या, तेच माझ्यासाठी सर्वात मोठी भेट असेल, आणि मला त्याचा अभिमान असेल असे माधुरी लोखंडे यांनी विध्यर्थिनींना समजूत देऊन प्रोत्साहन यावेळी दिले.

यावेळी अधीक्षक महादेव भंडारी, शिक्षक शिवाजी केने आणि सोनू पागी सर, कर्मचारी रवींद्र पवार परिवार सह उपस्थित होते.

चिंबीपाडा हे गाव तालुका भिवंडी, ठाणे जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज वास्तव्यास आहे, तर त्या गावातील परिसरातील आदिवासी वाडी, पाडा, आजूबाजूचे गावातील पालक उदरनिर्वाह साठी इतरत्र कामासाठी जातात, तर त्याच्या मुलांना योग्य शिक्षण मिळावे म्हणून शासनाने आदिवासी विभाग मार्फत निवासी आश्रमशाळा सुरु केल्या आहेत, तर तेथे आदिवासी समाज आपल्या मुलांना तेथे शिक्षणासाठी दाखल करतात, आणि शिक्षण पूर्ण करतात, त्यामुळे आपण शहरात स्थानिक झालो असलो, तरी आपला जन्मदिन वाढदिवस विद्यार्थी विध्यर्थिनी सह साजरा करून त्यांना झालेल्या आनंदात स्वतः आनंद मिळत असल्याचे मनोगत माधुरी लोखंडे यांनी व्यक्त केले.

# नवी मुंबई मनपाच्या कंत्राटी कामगारांचा वेतन प्रश्न मार्गी लावणार - मंत्री आकाश फुंडकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेत कंत्राटी कामगारांच्या वेतनाचा प्रश्न लवकरच निकाली काढण्यात येईल. यासंदर्भात नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनी कार्यवाही करून कंत्राटी कामगारांचा प्रश्न लवकर मार्गी लावावा, असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले. नवी मुंबई महानगर पालिकेतील ८ हजार कंत्राटी सफाई कामगार तसेच ठोक मानधन रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या १००८ कामगारांच्या वेतनाबाबत कामगार मंत्री यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक आयोजित करण्यात आली.



# अडचणींवर मात करणारा इतिहास घडवतो

## - माजी खासदार संजीव नाईक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / नवी मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या बालपणात नेहमी मावळे निर्माण केले. त्यामुळे सोळाव्या वर्षातच तोरणा किल्ला जिंकला. हा विजय प्राप्त करताना छत्रपतींनी विविध अडचणीवर मात केली. त्यानंतर त्यांनी विविध गड किल्ले जिंकले. हे करत असताना त्यांनी स्वराज्याची पायाभरणी केली. त्यामुळे अडचणी मात करतो तोच इतिहास घडवतो असे गौरवोद्गागार ठाणे मतदारसंघाचे माजी खासदार संजय नाईक यांनी छत्रपती शिवरायांबद्दल बोलताना काढले.

कोपरखैरणे येथील कै. शिवाजीराव पाटील मैदान, सेक्टर 15 ते 18 येथे शुक्रवार दिनांक 14 फेब्रुवारी 2025 रोजी न्यू मॉडर्न स्कूल व एकता महाविद्यालय कोपरखैरणे या दोन्ही शाळांचा 24 वा स्नेहसंमेलन तसेच न्यू मॉडर्न शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कविवर्य बसवराज लच्याणे यांच्या प्रेमरूपी जीवन या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा माजी खासदार संजीव नाईक यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर सुलेखनकार विलास समेळ, शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस, सचिव ज्ञानेश्वर गोसावी, शिवछत्रपती शिक्षण संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष भास्कर देशमुख, राजू लहासे, प्रा.रवींद्र पाटील, प्रा प्रताप महाडिक, माजी नगरसेविका भारती पाटील, माजी नगरसेवक रविकांत पाटील, मुख्याध्यापिका संगीता लच्याने आणि संस्थेची उपाध्यक्ष साहेबराव लच्याने व इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिक्षण क्रांती संघटनेचे सचिव ज्ञानेश्वर गोसावी यांनी गोट्या या दूरदर्शन मालिकेतील गीतकार व कवी मधुकर आरकडे यांची बीज अंकुरे अंकुरे, ओल्या मातीच्या कुशीत ही कविता अध्यापक ज्ञानेश्वर गोसावी यांनी सादर केली. या कवितेच्या गायनाला विद्यार्थ्यांनी टाळया वाजवत प्रतिसाद दिला. त्यानंतर विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.

### शहापूर तालुक्यात

# रोजगार हमी योजनेचा बोजवारा

## पाच महिन्यांपासून मजूर वेतनापासून वंचित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / शहापूर : शहापूर तालुक्यात रोजगार हमी योजने अंतर्गत एकूण २५ हजार ४०३ कुटुंबाची जॉब कार्ड धारक म्हणून शासकीय नोंद आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरीचे काम करणाऱ्या या सर्व मजुरांना गेल्या पाच महिन्यांपासून त्यांच्या रोजंदारी कामाची मजुरी मिळालेली नाही. तब्बल ६४, लाख ७३ हजार ५६३ रुपये इतकी मुजरांची वेतनासाठी असलेली रक्कम सरकारकडे निधी उपलब्ध नसल्याने थकीत असल्याची धक्कादायक अशी माहिती हाती आली आहे. मजूरीची रक्कम आम्हाला कधी मिळेल यासाठी मजूरांची कुटूंब रोज शहापूर रोजगार हमी योजना कार्यालयत चौकशीसाठी हेलपाटे मारत आहेत. मजुरीचे पैसे वेळेवर मिळत नसल्याने मोल मजुरी करून उदरनिर्वाह भागविणाऱ्या गरीब मजूर कुटूंबावर उपासमारीचे संकट आहे. धक्कादायक म्हणजे 'रोहयो' कामांची शासकीय मजुरी वेळेवर मिळत नसल्याने आदिवासींचे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतर झाल्याचे वास्तव शहापूर तालुक्यात आहे. शहापूर पंचायत समितीच्या महात्मा गांधी, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कार्यालया अंतर्गत स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी ग्रामीण भागात विविध प्रकारची कामे हाती घेतली जातात. रस्ते तयार करणे, विहीर काढणे, तलावांचे गाळ काढणे, शौच खड्डे काढणे, घरकुल बांधकाम, भातशेती दुरुस्ती करणे, फळ बाग आणि वृक्ष लागवड करणे, बांबू लागवड करणे, जलतारा आणि संरक्षण भिंत बांधणे, रेन वॉटर हार्वेस्टिंग आदी कामे ग्रामपंचायत मार्फत रोहयोच्या माध्यमातून केली जातात. या कामावर स्थानिक लोकांना मजूर म्हणून काम उपलब्ध करून दिले जात आहे. गाव पातळीवर ग्रामपंचायत स्तरावर ही कामे करताना शासकीय मजूर म्हणून मंजूर कुटुंबांना जॉब कार्ड देखील देण्यात आली आहेत. याकरता त्यांची 4 of 14 बँक अकाऊंट देखील उघडण्यात आली आहेत. शासकीय दराप्रमाणे प्रत्येकी मजुरास २१७ रुपये, अशी अल्प मजुरी दिली जात आहे. ही मजुरी अगदी कमी तर आहेच, परंतु मजुरीचे पैसे देखील वेळेवर हातात मिळत नाहीत. अशी परिस्थिती आहे. सध्या स्थितीत शहापूर तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या विविध कामांवर मजुरीचे काम करुनही गेल्या पाच महिन्यांपासून जॉब कार्डधारक मजुरांना आपल्या मजुरीची रक्कम मिळालेली नाही. ऑक्टोबर महिन्यापासून मजुरांचे पैसे दिले गेले नाहीत. 'रोहयो'ची मजुरी देण्यासाठी सध्या सरकारकडे निधी उपलब्ध नसल्याचे कारण रोजगार हमी योजना कार्यालयातून मजुरांच्या कुटुंबियांना सांगण्यात येत आहे.

> रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामांचे पैसे मिळाले नाहीत ही वस्तुस्थिती खरी आहे. यामुळे मजूरांचे वेतन थकीत आहेत. निधी लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावा यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे आमचा पत्रव्यवहार सुरू आहे.
> - अनंता धलपे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय रोजगार हमी योजना, शहापूर

# राज्यातील एकही मराठी शाळा बंद होणार नाही

## फडणवीसांचे आश्वासन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मराठी शिक्षण जपण्यासाठी सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला असून राज्यातील एकही मराठी शाळा पटसंख्याअभावी बंद होणार नाही असे त्यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

ते म्हणाले, आम्ही सातत्याने सूचना देत आहो की कोणतीही मराठी शाळा बंद करू नये. तसेच आम्ही शाळांमध्ये मराठी शिकवणे सक्तीचे केले आहे. मग ती शाळा मराठी असो किंवा हिंदी. सूचनांचे योग्य पालन होण्यासाठी आम्ही एक यंत्रणा स्थापन करत आहे.

या पूर्वी राज्य सरकार ने लव्ह जिहाद विरोधात कायदा आणण्यासाठी 7 सदस्यांच्या समितीचे स्थापन केले आहे. या बाबत बोलताना ते म्हणाले, घटना खूप गंभीर आहे या प्रकरणांवर कारवाई केली पाहिजे. महाराष्ट्रात सातत्याने या घटनांमध्ये वाढ होत आहे. या वर आळा घालण्यासाठी कायदा आणला पाहिजे असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# शिवजयंती निमित्त 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रेचे आयोजन

रायगड : 19 फेब्रुवारीला शिवजयंती साजरी करण्यात येणार असून त्यानिमित्ताने शहरात 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रेचे आयोजन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. या दिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृष्यप्रणालीद्वारे देशास संबोधित करणार आहेत असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासीउपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) रविंद्र शेळके, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे यांसह पोलीस विभाग, पनवेल महानगरपालिका तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, पदयात्रेचा शुभारंभ पोलीस कवायत मैदान येथून होणार आहे. तर शिवाजी चौक येथे समारोप होणार आहे. यादरम्यान विविध चौकात मल्लखांब, दाडपट्टा, कुस्ती, आदिवासी नृत्य, योग, लेझिम पथक, पारंपारिक पोषाखातील मुले, स्वच्छता अभियान, समुहगानाचे आयोजन करण्यात येणार आहे. या पदयात्रेत 5000 विद्यार्थी, नागरिक, महिला सहभागी होणार आहेत. दि.19 फेब्रुवारी रोजी स.8वा. शिवचरित्रावर व्याख्यान होणार आहे. स.8.30 वा पदयात्रेस प्रारंभ होणार आहे.या पदयात्रेदरम्यान पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच आरोग्यासाठी ॲम्ब्युलंसची सुविधा करण्यात यावी. पोलीस विभागाने या दरम्यान वाहतूक व्यवस्था चोख ठेवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जावळे यांनी संबंधितांना दिले. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्यात हा कार्यक्रम दिमाखदारपणे साजरा झाला पाहिजे. याकरिता ज्या ज्या विभागांना या पदयात्रेदरम्यान जबाबदाऱ्या दिल्या आहे त्या त्यांनी व्यवस्थितपणे पार पाडाव्यात अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा असलेली पाच मुले व भारत मातेची वेशभूषा असलेल्या पाच मुली आणि त्यांच्याकरिता लागणारे घोडे याचे नियोजन करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.जास्तीत जास्त नागरिकांनी my bharat पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी केले आहे.

# मेट्रो उड्डाणपुलास रतन टाटांचे नाव द्या - मनसेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / मुंबई : दिवंगत उद्योगपती आणि पद्मविभूषण पुरस्कार विजेते रतन टाटा यांचे मेट्रो उडाणपुलास नाव द्या, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आज आंदोलन केले. यासंदर्भात मनसे शहराध्यक्ष संदीप राणे यांनी ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार नरेंद्र मेहता आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संजय मनसेची मागणीदर प्लेझंट पार्क, ब्रेड काटकर यांना निवेदनही दिले. या निवेदनात मिरा भाईंदर प्लेझंट पार्क ब्रँड फॅक्टरी ते साईबाबा नगरपर्यंत मेट्रोच्या खाली बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलाला 'रतन टाटा उड्डाणपूल' नाव देण्याची मागणी केली आहे. यासंदर्भातील मागणीसाठी आज राणे यांनी कार्यकर्त्यांसह आंदोलन केले केले. यावेळी त्यांनी सांगितले की सदर उड्डाणपुलाचे उद्घाटन झाले आहे. मात्र तरी अद्याप त्याला कोणतेही अधिकृत नाव दिलेले नाही. या पुलाला रतन टाटा यांचे नाव द्यावे, अशी आमची मागणी आहे.

# दुर्गाडी किल्ल्याच्या डागडुजीचे काम सुरु करा

## - जिल्हा सत्र न्यायालय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण - दुर्गाडी किल्ल्याच्या डागडुजीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली पूर्ण करण्याचे आदेश कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाने दिले आहेत, अशी माहिती न्यायालयात हंदू धर्मीयांची बाजू मांडणारे वकील ॲड. जयेश साळवी यांनी दिली. मागील तीन महिन्यांच्या कालावधीत दोन वेळा दुर्गाडी केल्ल्याचा दावा कल्याण न्यायालयात सुनावणीसाठी आला होता. या शव्यात न्यायालयाने दुर्गाडी किल्ला शासनाचाच असल्याचे स्पष्ट करून या किल्ल्यावर अन्य कोणाचाही हक्क नसल्याचे स्पष्ट केले होते. १९७६ मध्ये मजलिस ए मुशावरीन ट्रस्ट आणि कल्याण येथील मुस्लीम जमात समाजाच्यावतीने किल्ला दुर्गाडीवरील इदगाह, मोस या वास्तूंच्या मालकी हक्कासाठी आणि मनाई हुकुमासाठी दावा दाखल केला होता. श्री दुर्गाडी देवी उत्सव समिती आणि काही हिंदू धर्म संघटना, या धर्मातील काही प्रतिष्ठित व्यक्तींकडून या दाव्याला विरोध केला होता. या दावेदारीवरून न्यायालयाने किल्ल्यावरील कामाला जैसे थेचे आदेश दिले होते. दुर्गाडी किल्ल्यावर डागडुजीची कामे सुरू असल्याने, दुर्गाडी किल्ला ऐतिहासिक वारसा हक्कातील वास्तू असल्याने न्यायालयाने शासनाला डागडुजीचे हक्क दिले. मजलिस ए मुशावरीन ट्रस्टने याप्रकरणी न्यायालयात आव्हान अपील दाखल केले. न्यायालयाच्या यापूर्वीच्या आदेशाला स्थगिती देण्यासाठी अर्ज दाखल केला. न्यायालयाने तो अर्ज फेटाळला. मजलिस ए मुशावरीन ट्रस्ट आणि जमात यांनी न्यायालयात दिवाणी अपील दाखल केले. याप्रकरणात शिवसेना उपनेते विजय साळवी, दिनेश देशमुख आणि हिंदू धर्मातील जाणत्यांनी न्यायालयात कॅव्हेट दाखल केले होते. पण न्यायालयाने किल्ल्यासंदर्भात जैसे थेचा आदेश दिला. त्यामुळे किल्ल्यावरील डागडुजीची कामे थांबविण्यात आली होती. हा जैसे थेचा आदेश उठविण्यासाठी ॲड. भिकाजी साळवी, ॲड. जयेश साळवी यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला. या अर्जावर न्यायालयाने मंगळवारी सुनावणी घेतली. सुधारीत आदेश जारी करून २ जानेवारी रोजी दिलेला आदेश दुरुस्त करण्यात आला. या सुधारित आदेशाप्रमाणे शासनाला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली दुर्गाडी किल्ल्यावरील डागडुजीची कामे करण्यासाठी मुभा देण्यात आली.

# बदलापुरात 'नक्शा' प्रकल्पाचा होणार शुभारंभ

बदलापूर : कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील मिळकतींचे अचूक भूमापन करून नकाशे व मिळकत पत्रिका तयार करण्यासाठी केंद्र शासनाने 'नक्शा' प्रकल्प सुरू केला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा शुभारंभ आणि ड्रोन फ्लाईंग येत्या मंगळवार, दि.18 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 11 वाजता कुळगाव-बदलापूर नगरपरिषद सभागृह, दुसरा मजला, श्रीजी बिल्डींग, घोरपडे चौक, कात्रप, बदलापूर (पूर्व) येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे, विधानपरिषद सदस्य निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, विधानसभा सदस्य किसन कथोरे, डॉ.बालाजी किणीकर, सुलभा गायकवाड कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बाबासाहेब रेडेकर, उपसंचालक अनिल माने, उपविभागीय अधिकारी विजयानंद शर्मा यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

तरी, या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अंबरनाथ तहसिलदार अमित पुरी, कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड आणि उपअधीक्षक भूमी अभिलेख अंबरनाथ सुवर्णा पाटील यांनी केले आहे.

# जिल्हा स्तरीय कराटे स्पर्धेत पेण तालुका दुसरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / पेण : नुकत्याच पनवेल येथे झालेल्या युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन इंडिया ह्या कराटे संस्थेने आयोजित केलेल्या जिल्हा स्तरीय कराटे स्पर्धा पेण तालुक्यातील रविंद्र म्हात्रे विनायक पाटील प्रथमेश मोकल तसेच प्राजक्ता तेटमे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आसलेल्या विद्यार्थांनी 14 गोल्ड मेडल, 9 सिलव्हर मेडल,व 3 ब्रांझ मेडल पटकावले त्यांच्या ह्या यशा मुळे पेण तालुक्याला द्वितीय क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्राफी देऊन सन्माननीय करण्यात आले.ह्या स्पर्धेत उरण,कर्जत, खालापुर, पेण ,अलिबाग,पनवेल येथुन,स्पर्धक आले होते. ह्या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभासाठी लक्ष्मी पब्लिक स्कूल चे चेअरमन महेश पाटील तसेच युनायटेड चे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर विविध तालुक्यातील प्रशिक्षक चिंतामणी मोकल भालचंद्र भोईर,जिवन ढाकवळ पीयुष सदार्वते वरद केणी युनायटेड चे प्रसिद्धी प्रमुख प्रतिक कारंडे उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन प्रमुख लक्ष्मी पब्लिक स्कूल चे सी.ई.ओ. युनायटेड चे डायरेक्टर प्रशांत गांगुर्डे आणि आलोक सर यांनी केले होते .

### 'जैंवविविधतेचे सप्तरंग' चित्रकला स्पर्धेत

# अपर्णा शर्माने मिळवला द्वितीय क्रमांक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / ठाणे : झाडे, फुले, फळे आणि रोपे यांचे वृक्षवल्ली-२०२५ हे भव्य प्रदर्शन ठाणे महानगरपालिकेचा उद्यान विभाग आणि वृक्षप्राधिकरण यांच्यातर्फे शुक्रवार, १४ फेब्रुवारी ते रविवार, १६ फेब्रुवारी या काळात रेमंड कंपनीचे मैदान, पोखरण रोड येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

'वृक्षवल्ली' प्रदर्शनाचे यंदाचे १४ वे वर्ष आहे. यंदाचे प्रदर्शन हे 'जैवविविधतेचे सप्तरंग' या संकल्पनेवर आधारित असून या प्रदर्शनात स्थानिक ३० शाळांतील विद्यार्थ्यांनी चित्रकला व निसर्गाशी निगडीत देखावे साकारले आहेत. त्याचबरोबर प्रदर्शनामध्ये 'वृक्षवल्ली-२०२५' प्रदर्शनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार, १६ फेब्रुवारी 2025 रोजी पार पडला. यावेळी चित्रकला स्पर्धेत ज्ञानोदय विद्यामंदीर, सावरकर नगर, ठाणे येथील शाळेची विद्यार्थीनी अपर्णा शर्मा हिस व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्यामुळे ज्ञानोदय विद्यामंदिर शाळेचे प्राचार्य डॉ. प्रेमचंद्र तिवारी, सचिव आर एन तिवारी, विनय तिवारी, अनिल तिवारी, चित्रकला शिक्षक शिंपी सर, संस्थेचे पदाधिकारी व सर्व शिक्षकांनी अपर्णा शर्मा हिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### बिर्ला महाविद्यालयात

# हवामानातील बदल विषयावर चर्चासत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण: हवामान बदल आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी तांत्रिक हस्तक्षेप या विषयावर कल्याणच्या बी. के. बिर्ला महाविद्यालयात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस इंडिया, मुंबई पेंटर (नासी-एमसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचा उद्देश विशेषतः कल्याणच्या ग्रामीण आणि आदिवासी भागात जैवविविधता, हवामान बदल आणि शाश्वत पर्यावरण संवर्धन धोरणांविषयी जनजागृती करणे हा होता. परिसंवादाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सत्राने झाली. प्रमुख पाहुणे कल्याण येथील बी. के. बिर्ला महाविद्यालयाचे उपाध्यक्ष सुबोध दवे यांनी हवामान विषयक कृतीचे महत्त्व अधोरेखित केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पाटील यांनी निमंत्रित पाहुण्यांचे स्वागत व तर बीकेवीसीकेचे संचालक व नासीचे सदस्य डी. नरेश चंद्रा यांनी अध्यक्षीय भाषण कैमने, नासी मुंबई चॅप्टरचे अध्यक्ष प्रा.ए. के. सिंग यांनी नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडियाच्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमात मान्यवर तज्ज्ञांनी अभ्यासपूर्ण सादरीकरण केले. आयआयटी मुंबईच्या सेंटर फॉर कलायमेट स्टडीजचे प्रा. रघु मुर्तुगुट्टे यांनी भारतातील हवामान बदलाची आव्हाने या विषयावर मनोरंजक भाषण केले. स्प्राउट्स, मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापक डॉ. आनंद पेंढारकर यांनी कल्याण परिसरातील वनस्पती आणि प्राण्यांच्या किनारपट्टीवरील विविधतेवर चर्चा केली आणि किनारपट्टीच्या परिसंस्थांचे पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले. हेमंत कारखानीस यांनी मुंबई आणि कल्याणमध्ये खारफुटी संवर्धनासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. दुपारच्या सत्रात बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे (बीएनएचएस) उपसंचालक डॉ. राहुल खोत उपस्थित होते.

# ठाणे जिल्हा परिषदेतर्फे जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / ठाणे- शेतकरी व पशुपालक यांनी प्रेरणा घेऊन पशुपालन उद्योग, शेती व्यवसायाबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे पशुसंवर्धन विभाग अंतर्गत 'जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन' शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ९ वा. आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, बापगाव, भिवंडी येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.


ठाणे जिल्ह्यातील पशुपालकांनी जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक रोहन घुगे यांनी केले आहे.

या प्रदर्शनासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रादेशिक सहायुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. वल्लभ जोशी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे.

या प्रदर्शनास लोकसभा सदस्य डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे, लोकसभा सदस्य बाळ्यामामा-सुरेश गोपीनाथ म्हात्रे, लोकसभा सदस्य नरेश गणपत म्हस्के, विधानसभा सदस्य ज्ञानेश्वर बारकू म्हात्रे, विधानसभा सदस्य रविंद्र दत्तात्रय चव्हाण, विधानसभा सदस्य दौलत भिका दरोडा, विधानसभा सदस्य संजय मुकुंद केळकर, विधानसभा सदस्य कुमार उत्तमचंद आयलानी, विधानसभा सदस्य महेश प्रभाकर चौगुले, विधानसभा सदस्य विश्वनाथ आत्माराम भोईर, विधानसभा सदस्य राजेश गोवर्धन मोरे, विधानसभा सदस्य निरंजन वसंत डावखरे, विधानसभा सदस्य डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड, विधानसभा सदस्य किसान शंकर कथोरे, विधानसभा सदस्य मंदा विजय म्हात्रे, विधानसभा सदस्य डॉ. बालाजी प्रल्हाद किणीकर, विधानसभा सदस्य शांताराम तुकाराम मोरे, विधानसभा सदस्य नरेंद्र मेहता, विधानसभा सदस्य रईस कासम शेख, विधानसभा सदस्य सुलभा गणपत गायकवाड या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदर्शन संपन्न होणार आहे.

या प्रदर्शनात पशुधनांचे स्टॉल ६०, इतर स्टॉल १५ असे एकूण ७५ स्टॉल लावण्यात येणार आहे. प्रदर्शनात जात निहाय पशुधन १००, पक्षी ६० पाहण्यासाठी उपलब्ध असतील. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या मदतीने शौचालय (मोबाईल टॉयलेट), अग्निशामक पथक, आरोग्य विभागामार्फत आरोग्य यंत्रणा, ग्रामपंचायत विभागामार्फत सफाई कामगारांमार्फत सफाई व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. समीर तोडणकर यांनी दिली.

# उपप्राचार्य सुरेश सापळे यांना मातृशोक



शहापूर ग्रामिण : वासिंद येथील विद्या विकास मंडळ संचलित सरस्वती विद्यालयाचे कार्यरत उपप्राचार्य व दैनिक जीवनदीपचे वासिंद प्रतिनिधी सुरेश अण्णा सापळे यांच्या मातोश्री कै. म्हाळसाबाई अण्णा सापळे (वय 89) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

अल्याणी येथील असलेले सुरेश सापळे यांच्या मातोश्री कै. म्हाळसाबाई या अतिशय मायाळू व प्रेमळ स्वभावाच्या होत्या. शनिवारी 15 फेब्रुवारी रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेवेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी, ग्रामस्थ व नातलग, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

18 Feb 2025_31 Dec 2024.qxd 17-Feb-25 23:05 Page 1



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज

# शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण



### शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आमदार किसन कथोरे यांचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : उल्हास नदीच्या शेजारी बदलापूर गावाकडे जाताना छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवार दुपारी 2 वाजता होणार आहे. या अनावरण सोहळ्याला शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी केले आहे. आमदार किसन कथोरे यांच्या संकल्पनेतून हा अश्वारूढ पुतळा उभारण्यात येत असून या अश्वारूढ पुतळ्याच्या अवतीभवती शिवसृष्टीही उभारण्यात येणार आहे. तसेच विविध संग्रहांचे ही या ठिकाणी निर्मिती करण्यात येणार आहे. पुतळ्याशेजारी दररोज संध्याकाळी लेजर शोचेही आयोजन करण्यात येणार असून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आजच्या पिढीला कळावा व त्यांचे विचार समाजात अधिक घट्ट



व्हावेत या हेतूने या अश्वारूढ पुतळ्याच्या सभोवतालच्या परिसराचा विकास करण्यात येणार असल्याचे आमदार किसन कथोरे यांनी सांगितले. मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस हे पहिल्यांदाच बदलापुरात येत आहेत. त्यानिमित्ताने जाहीर सभेचे आयोजन बदलापूर पश्चिम येथील उल्हास नदी शेजारील रोझरी शाळेच्या मैदानावर करण्यात आले आहे.

या जाहीर सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा लाडक्या बहिणींच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त बदलापूरकरांनी या सोहळ्याला उपस्थिती लावण्याचे आवाहन आमदार किसन कथोरे यांनी केले आहे.

### बदलापूरचे नाव शिवकालीन बदलापूर करण्याची मागणी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या बदलापूरच्या भूमीला एक वेगळं महत्त्व आहे. बदलापुरात छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्वात जुने मंदिर बदलापूर गावात आहे. तसेच बदलापूर गावात 1920 सालापासून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शिवजयंती उत्सवाचे अध्यक्षही होते. त्यामुळे बदलापूर हे वेगळ्या विचारांचे शहर आहे. आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा जपणारं शहर म्हणून बदलापूर गावाला शिवकालीन बदलापूर असे नामकरण करावे अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे आमदार किसन कथोरे यांनी सांगितले.

# तलाठी संघटनेचे काम बंद आंदोलन मागे




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील तलाठी संघटनेने पुकारलेल्या काम बंद आंदोलनामुळे गेल्या २० दिवसांपासून उत्पन्न दाखला मिळत नसल्याने रुग्ण, विद्यार्थी आणि नागरिक हवालदिल झाले असून त्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन तलाठी संघटनेने अखेर सोमवारी काम बंद आंदोलन मागे घेतले आहे. यामुळे वैद्यकीय कामासाठी रुग्णांना, शिष्यवृत्ती व स्पर्धा परिक्षांचा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना आणि शासकीय कामांसाठी नागरिकांना उपत्न्न दाखला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ठाणे, कल्याण, मुरबाड, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी आणि शहापूर असे एकूण सात तालुके ठाणे जिल्ह्यात येतात. तालुका स्तरावरील तहसील कार्यालयातून नागरिकांना उत्पन्न दाखला, रहिवास प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्र तयार करून दिली जातात. यातील उत्पन्नाच्या दाखल्यासाठी नागरिकांनी अर्ज केल्यास त्याची तपासणी तलाठींकडून केली जाते. ठाणे जिल्ह्यात दररोज तीनशे ते चारशे उत्पन्न दाखले दिले जातात. प्रत्येक तालुक्यात दररोज ५० ते ६० उत्पन्न दाखल्यांसाठी अर्ज येतात. अर्जदाराने दिलेले स्वयंघोषणापत्र आणि कागदपत्रांच्या आधारे तलाठी उत्पन्न दाखला तयार करून तो पुढे तहसीलदारांकडे पाठवितात. त्याआधारे नागरिकांना उत्पन्नाचे दाखले तहसील कार्यालयातून उपलब्ध करून दिले जातात.

तलाठींच्या अहवालानुसार दाखला देण्यात येत असल्याचा उल्लेख उत्पन्नाच्या दाखल्यावर केला जातो. यामुळे त्या दाखल्यात खोटी माहिती आढळून आली तर, संबंधित तलाठींवर कारवाई होते. काही ठिकाणी तलाठींवर गुन्हेही दाखल झालेले आहेत. या कारवाईच्या भितीमुळे तलाठींनी उत्पन्न दाखल्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या तपासणीचे काम बंद केले होते. महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेच्या ठाणे जिल्हा विभागाने हे आंदोलन पुकारले होते. या आंदोलनामुळे ठाणे जिल्ह्यात गेल्या २० दिवसांपासून उत्पन्न दाखल्यांचे काम ठप्प झाले होते. दाखल्याविना रुग्ण, विद्यार्थी आणि नागरिकांची कामे खोळंबली होती. यावरून तलाठींवर टिका होत होती. दरम्यान, दाखल्याविना रुग्ण, विद्यार्थी आणि नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन तलाठी संघटनेने अखेर सोमवारी काम बंद आंदोलन मागे घेऊन उत्पन्न दाखला देण्याचे काम सूरु केले आहे.

# बदलापूर पालिकेसाठी भाजपाचा स्वबळाचा नारा





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर (वार्ताहर) : बदलापूर नगरपालिकेची आगामी निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे संकेत देत भाजपाची एकहाती सत्ता आणणार असल्याचा दावा आमदार किसन कथोरे यांनी केला आहे. तसेच बदलापूर नगरपालिकेची आगामी निवडणूक चुरशीची ठरणार आहे. विधानसभा निवडणुकीत मुरबाड विधानसभा मतदारसंघात भाजपाचे आमदार किसन कथोरे विरूद्ध शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी आणि भाजपाचे पदाधिकारी असे चित्र निर्माण झाले होते. शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी सुरूवातीला थेट विरोध करत नंतर प्रचारातून काढता पाय घेतला होता. त्यामुळे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची, माजी नगरसेवकांची कोंडी झाली होती. शहरप्रमुखाच्या भूमिकेला पाठिंबा द्यायचा की महायुतीचा धर्म पाळायचा अशा संभ्रमात ते होते. त्यातच भाजपाचे माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनीही प्रचारातून अंग काढल्याने किसन कथोरे एकटे लढत असल्याचे चित्र होते. त्यांच्या मदतीला ऐनवेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे धावून आले.

शिंदे यांनी शिवसेनेच्या वरिष्ठ नगरसेवकांना थेट फोन करून आमदार कथोरे यांचे काम करण्याचे आदेश दिले होते. तर प्रचाराच्या शेवटच्या दिवशी शिवसेनेच्या उमेदवारांच्या सभा घेण्याऐवजी आमदार कथोरे यांच्यासाठी बदलापुरात सभा घेतली होती. त्यानंतर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी कथोरे यांच्यासाठी काम केले. मात्र या सर्व प्रकारात कथोरे दुखावले होते. त्यांनी विजयाला काही तास उलटत नाही तोच आपल्या पहिल्याच भाषणाच सर्व विरोधकांना निर्वाणीचा इशारा दिला होता. माजी लोकांना पुन्हा आजी होऊ देणार नाही, असेही कथोरे त्यावेळी म्हणाले होते. त्यानंतर बदलापूर शहरात कथोरे विरूद्ध वामन म्हात्रे यांच्यात शाब्दीक चकमकी होतच होत्या. आता कथोरे यांनी पुन्हा पालिका निवडणुकांमध्ये भाजपा एकहाती सत्ता स्थापन करू शकते असा दावा केला आहे.





